# फिनोलेक्सला बेस्ट सीएसआर इंटिग्रेटेड बिझनेस पुरस्कार

**बंगळुरू :** फिनोलेक्स इंडस्ट्रीज लि. (एफआयएल) या पीव्हीसी पाईप्स आणि फिटिंग्समधील भारतातील आघाडीच्या उत्पादक कंपनीला आणि त्यांचे सीएसआर भागीदार मुकुल माधव फाऊंडेशन (एमएमएफ) यांना, त्यांच्या सीएसआर आणि सस्टेनॅबिलिटी क्षेत्रात अप्रतिम कार्यासाठी नॅशनल सीएसआर लीडरशीप काँग्रेस ॲण्ड अवॉर्ड्सतर्फे संस्थात्मक विभागात मबेस्ट सीएसआर इंडिग्रेटेड बिझनेसफहा राष्ट्रीय पुरस्कार देण्यात आला. बंगळुरू येथे हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्यांचे सीएसआर भागीदार मुकुल माधव फाऊंडेशनच्या सोबतीने या समाजविकास कार्याला आपल्या दैनंदिन कामकाजाचा भाग बनवून या क्षेत्रात केलेल्या अद्वितीय कामगिरीसाठी फिनोलेक्स इंडस्ट्रीज ओळखली जाते. एफआयएल आणि एमएमएफमध्ये आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक उन्नतीच्या माध्यमातून वंचित समाजगटाच्या एकात्मिक विकासावर भर दिला जातो. या संपूर्ण काळात त्यांची भक्कम दूरदृष्टी आणि या कामातील त्यांची झोकून देण्याची वृत्ती यामुळे हजारो कुटुंबांमध्ये आज एक चिरकालीन हास्य निर्माण झाले आहे.